जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 NOV 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा शनिवारी वर्धापनदिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा वर्धापनदिन शनिवारी (दि. १८) साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) एस. पी. काणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी विविध गुणवंतांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे असणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के हे उपस्थित असणार आहेत. कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

14 NOV 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येक नागरिकाला 'जीवन संजीवन प्रणाली' अवगत असावी

## डॉ. अमोल कोडोलीकर यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ व अॅस्टर आधार हॉस्पिटलतर्फे कार्यक्रमाचे आयोजन


प्रतिनिधी
कोल्हापूर

माणसाची हृदयक्रिया अचानक बंद पडल्यानंतर त्यास जीवनदान देण्यासाठी सुरुवातीचे काही सेकंद सुवर्णक्षण ठरु शकतात. त्यासाठी जगातील प्रत्येक जबाबदार नागरिकास जीवन संजीवनीचे (बेसिक लाईफ सपोर्ट)महत्व अवगत असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अॅस्टर आधारचे संचालक व प्रमुख भूलतज्ज्ञ डॉ.अमोल कोडोलीकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर हे होते.

शिवाजी विद्यापीठ आणि अॅस्टर आधार हॉस्पिटल, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये जीवन संजीवनी विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचेमध्ये आरोग्य विषयक जनजागृती निर्माण करण्यासाठी बेसिक लाईफ सपोर्ट ही आपत्कालीन समयी गोल्डन आवरमध्ये वापरली जाणारी प्रथमोपचाराची पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

याप्रसंगी डॉ.अमोल कोडोलीकर म्हणाले, आज जगभरामध्ये प्रती ९० सेकंदामध्ये एका माणसास हृदयविकाराचा झटका येत आहे. यामध्ये साठ ते सत्तर टक्के लोक हृदयक्रिया बंद पडल्यामुळे हॉस्पिटलपर्यंत पोहचू शकत नाही.

ते म्हणाले, एखाद्याची हृदयक्रिया बंद पडल्यानंतर त्या पेशंटला भोवळ येते. या सुरुवातीच्या काळामध्ये पहिली तीस सेकंद ते पाच मिनिटे या दरम्यान त्या व्यक्तीच्या खांद्यास थाप मारुन जागृत करण्याचा प्रयत्न करावा. जागृत न झाल्यास त्वरीत श्वास तपासावा. प्रतिसाद देत नाही म्हणजे हृदयक्रिया बंद पडलेली आहे, असे समजावे. यावेळी जीवन संजीवनीचा वापर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बेसिक लाईफ सपोर्टबाबत, प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करताना डॉ. अमोल कोडोलीकर.

करावा. म्हणजे, एका विशिष्ट पध्दतीत गुडघ्यावर बसून दोन्ही हात सरळ रेषेत एकमेकावर ठेवून त्या व्यक्तीच्या छातीवर मधोमध दाब द्यावा. हा दाब १०० ते १२० वेळा प्रती मिनीट असावा व हा दाब दोन इंचापर्यंत खोलवर पोहचेल याची दक्षता घ्यावी. यामुळे पंचवीस टक्के रक्त पुरवठा हृदयाकडून मेंदूपर्यंत जाण्याची प्रक्रीया सुरु होते. त्यानंतर लगेचच १०८ क्रमांकाशी संपर्क साधून हॉस्पिटलमध्ये त्या व्यक्तीस दाखल करावे. परंतु, अपघातग्रस्त व्यक्तींना हृदयविकाराचा त्रास झाल्यास हे उपचार करु नये असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रारंभी अॅस्टर आधारच्या प्रशासकीय अधिकारी सौ.आयेशा रारुत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सिईओ डॉ.चाडीलकुमार यांनी कार्यक्रमाचे महत्व विषद केले. तर विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.व्ही.ए.रानडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला अॅस्टर आधारचे कार्यकारी संचालक डॉ.उल्हास दामले, मुख्य व्यवस्थापक शिवानंद अपराज, डॉ. आर.आर.देशपांडे, डॉ.राहूल ढाणे, डॉ.टी. के.पाटील उपस्थित होते.

14 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आमने-सामने




**शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळ (सिनेट) निवडणूक १७ नोव्हेंबर रोजी होत आहे. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार प्रथमच ही निवडणूक होणार आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ यांच्यात दुरंगी लढत रंगली आहे. या पार्श्वभूमीवर सुटा आणि विकास आघाडी यांच्या भूमिकांचा घेतलेला वेध.**



संकलन : अनुराधा कदम

# 'आघाडी' विद्यापीठ विकासासाठी

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार होणारी ही पहिलीच निवडणूक आहे. त्यामुळे सिनेटवर निवडून येणाऱ्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता हा महत्त्वाचा निकष आहे. या निकषपूर्तीत कोणतीही कसूर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने बाकी ठेवलेली नाही. संस्था प्रतिनिधी, संस्थाचालक, प्राचार्य, विद्यार्थी, पदवीधर अशा विद्यापीठाशी निगडीत असलेल्या प्रत्येक घटकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एकत्र आलेली शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व विद्यापीठ मंचासोबत केलेली युती निर्णायक ठरणार आहे. येत्या निवडणुकीत सिनेटवर वर्चस्व मिळेलच.




**डॉ. संजय पाटील**
अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी

शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळावर निवडून आल्यानंतर जेव्हा शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) सिनेटवर काम करताना एकतंत्री कारभार सुरू केला, त्यामुळेच 'सुटा'ची पिछेहाट झाली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाशी निगडीत प्रत्येक घटकाच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आणि विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय दर्जावर पोहोचवण्यासाठी शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी 'सुटा'चे आस्तित्व मोडीत काढण्यासाठी जोमाने प्रयत्न करणार आहे. जुन्या कायद्यानुसार झालेल्या निवडणुकांमध्ये शिक्षक केंद्रस्थानी होता. त्यानंतर संस्था चालकांचे प्रतिनिधीत्व या निवडणुकीत वाढले. २००५ पर्यंत अधिसभा निवडणुकीत एकतंत्री कारभार दिसत होता. त्याचा त्रास संस्था चालक व प्राचार्यांना झाला. यातूनच संस्था चालक, प्राचार्य आणि विद्यार्थी संघटना यांनी त्यावेळी युती केली.

सध्याही आघाडीतील एकजूट अधिक बळकट झाली आहे. याचा फायदा निवडणुकीत विजयावर शिक्कामोर्तब करण्याकडे निश्चित होईल. 'सुटा'मधील अंतर्गत धूसफूस, हेवेदावे याचाही फटका 'सुटा'च्या सद्यस्थितीला बसला आहे. जी संस्था आपापसात वाद घालत आहे, ती सदस्यांचे प्रश्न कसे सोडवणार हा प्रश्न नक्कीच विचार करायला लावणारा आहे. संस्था चालक, प्राचार्य संघटना आणि 'अभाविप' यांनी एकत्र येऊन विद्यापीठ विकास आघाडीची स्थापना केली आहे. प्राचार्य गटातील दहापैकी नऊ तर संस्थागटातील सर्व सहा जागांवर, पदवीधरमधून ९ जागांवर आघाडीचा आघाडीचे वर्चस्व राहणार आहे. विद्यापीठ विकास आघाडीने गेल्या दहा वर्षांत विद्यापीठ, कॉलेज, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वच घटकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. विद्यापीठीय व कॉलेजमधील संशोधनाला प्राधान्यक्रम दिले. याचा फायदा सिनेट निवडणुकीत यशस्वी होण्यासाठी होईल.

# 'सुटा'चा शिक्षकांच्या न्यायासाठी लढा

शिवाजी विद्यापीठ आणि कॉलेजांमधील पावणेचार हजार शिक्षकांच्या प्रश्नांशी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ सातत्याने जोडलेला आहे. त्यामुळे शिक्षकांच्या प्रत्येक प्रश्नाला वाचा फोडणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे हा एकमेव अजेंडा घेऊन शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) अधिकार मंडळाच्या निवडणुकीत उतरला आहे. मान्यता, सेवाशर्थी, वेतनआयोग, पेन्शन यांसह शिक्षकांचे अनेक प्रश्न आहेत. मागण्या आहेत. सुटाच्या माध्यमातून त्या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी संघ नेहमीच सक्रिय आहे. सिनेट मंडळांवर शिक्षकांच्या प्रश्नांची जाण एकमेव 'सुटा'ला असल्यामुळेच आमच्या वर्चस्वाला आव्हान देणे सोपे नाही.



**डॉ. आर. जी. कोरबू**
सहकार्यवाह, विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा)

ॲकॅडमिक कौन्सिलवर सध्या एक जागा बिनविरोध करण्याला शिक्षक संघाला यश आले आहे. इतर जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत आमच्या विरोधात ज्या संघटना रिंगणात आहेत, त्यांना आमचा विरोध नाही, मात्र केवळ निवडणूक जिंकण्यासाठी एकत्र येणे आणि विद्यापीठाच्या विकासासाठी युती करणे यामध्ये फरक आहे. त्याचा विचार प्रत्येकाने करावा. केवळ निवडणूक म्हणून नव्हे तर शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व कॉलेजमधील प्राध्यापकांशी आणि विद्यापीठ स्तरावरील प्राध्यापकांशी सातत्याने संपर्क आहे. या संपर्क यंत्रणेचा आणि संवादाचा फायदा सिनेटवर यश मिळवण्यासाठी नक्कीच होईल. 'सुटा' एकतंत्री किंवा एकाधिकार पद्धतीने कारभार होतो असा आरोप होत असला तरी त्यामध्ये तथ्य नाही.

शिवाजी विद्यापीठाच्या कायद्यानुसार येणाऱ्या प्रस्तावांचा अभ्यास करून, त्यातील त्रुटींचा विचार करून जर काही निर्णय घेतले जात असतील तर त्यामध्ये एकतंत्र म्हणणे चुकीचे आहे. विद्यापीठ नव्या कायद्यानुसार १५वर्षे अनुभव आणि दोन विद्यार्थ्यांच्या पीएच.डी.साठी गाइड म्हणून पात्र ठरलेल्या प्राध्यापकांना उमेदवारीसाठी पात्र ठरवण्यात आले आहे. हे निकष योग्य असून अभ्यासू प्रतिनिधी सिनेटमध्ये जाणे आवश्यक आहे. 'सुटा' या निकषपूर्तीमध्ये कुठेही कमी पडलेली नाही.

'सुटा'मधील अंतर्गत वाद हा वाद नसून मतभेद आहेत. त्याचा 'सुटा'च्या कारभारावर कोणताही परिणाम होणार नाही. ऐन निवडणुकीच्या तोंडावर 'सुटा'बाबत चुकीच्या गोष्टी पसरवणाऱ्यांनी या गैरसमजात राहू नये. 'सुटा'ने आतापर्यंत विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या सात वेळा निवडणुका लढविल्या आहेत. हा प्रदीर्घ अनुभव आमच्या पाठीशी आहे. तो विजय मिळवून देईल.

14 NOV 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधर, शिक्षक उमेदवारांची पायाला भिंगरी

## तीन जिल्ह्यांतील मतदारांशी संपर्कासाठी धावाधाव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठ निवडणुकीसाठी आता अंतिम टप्प्यातील प्रचार सुरू आहे. विविध गटांतील उमेदवार मतदारांना प्रत्यक्ष भेटून मत देण्याचे आवाहन करत आहेत. यामध्ये पदवीधर आणि महाविद्यालयीन शिक्षक या गटांत मतदारांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे संबंधित उमेदवार पायाला भिंगरी लावून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील मतदारांशी संपर्क साधत आहेत.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीचे रणांगण आता ऐन थंडीत तापले आहे. अधिसभेसाठी असणाऱ्या पदवीधर आणि महाविद्यायीन शिक्षक गटांतील उमेदवारांचा प्रचार मात्र अत्यंत वेगात सुरू आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ टीचर्स असोसिएशन (सुटा) यांच्यात शिक्षक गटात चुरस आहे. पदवीधर गटात शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी कृती समितीच्या उमेदवारांना 'सुटा'ने पाठिंबा दिला आहे. त्यामुळे अंतर्गत पाठिंब्याची गणिते जय-पराजयाचे पारडे फिरवू शकतात.



शिवाजी विद्यापीठातून...

### राज्यपाल नियुक्त सदस्यांच्या नावांबाबत उत्सुकता

*निवडणुकीत विजयी होणाऱ्या उमेदवारांसह राज्यपाल आणि कुलगुरू नियुक्त प्रतिनिधींसंदर्भात शिक्षण क्षेत्रात उत्सुकता निर्माण झाली आहे. विकास आघाडीसोबत विकास मंचच्या संघटनांमध्ये 'अभाविप' आहे. सध्या राज्यपाल नियुक्ती झालेले अमित कुलकर्णी व प्रा. विवेक खंजोडे हे 'अभाविप'चे कार्यकर्ते आहेत. यापुढे आणखी कोणाची निवड होईल, याबाबत कुतूहल आहे. राज्यपाल आणि कुलगुरू नियुक्त प्रतिनिधित्वासाठी अनेकांनी 'फिल्डिंग' लावली आहे.*

पदवीधर गटातील एक जागा बिनविरोध झाली आहे. त्यामुळे नऊ जागांवर बहुरंगी सामना होत आहे. पदवीधरसाठी १४ हजार १७२ इतके सर्वाधिक मतदार आहेत. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणे अशक्य असल्यामुळे सामूहिक प्रचार सुरू आहे. शिक्षक गटात ३ हजार ३६६ मतदार आहेत. आघाडी व 'सुटा' या दोन्ही पारंपरिक गटांत सामना रंगला आहे. यामध्ये बंडखोरांनीही दोन्ही गटांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. उर्वरित गटांत मर्यादित मतदार असल्याने थेट भेट स्वरूपात संबंधित उमेदवारांकडून प्रचार सुरू आहे.

14 NOV 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात

## सकाळ, दुपार अन् संध्याकाळी प्रचाराचा 'डोस'!

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांसाठी शुक्रवारी १७ नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यांत ३३ केंद्रावर मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असताना प्रचाराची यंत्रणेच्या हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. मतदारराजा असणाऱ्या प्राध्यापक आणि पदवीधर मतदारांच्या थेट भेटी घेण्यासासाठी उमेदवारांची धावपळ सुरू झाली आहे. सकाळच्या सत्रात कॉलेजवर जाऊन प्राध्यापकांच्या भेटी, दुपारी पदवीधरांच्या थेट भेटी आणि संध्याकाळी ऑनलाईन चॅटिंगव्दारे उमेदवारांनी प्रचाराचे रान उठवले आहे.

विद्यापीठ निवडणूक अवघ्या तीन दिवसावर येऊन ठेपल्यामुळे विद्यापीठ विकास आघाडी विरूद्ध सुटा तर काही ठिकाणी विद्यापीठ विकास आघाडी विरूध्द आजी-माजी विद्यार्थी संघटना अशी लढत होणार आहे. शिक्षक व पदवीधर मतदार गटात चुरशीची लढत होणार आहे. सर्वच संघटना काही



ठिकाणी सामुहिक प्रचार करताना दिसत आहेत.

प्रचार दौऱ्यासाठी प्रत्येक संघटनेने जिल्हावार गट केले आहेत. हे गट गावोगावी जावून मतदारांच्या भेटी, बैठका, मेळावे घेवून आपल्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी आवाहन करीत आहेत. तर काही ठिकाणी तडजोडीचे गणित सुरू आहे. पदवीधर व शिक्षक गटात पारदर्शक कारभार असा उद्देश घेऊन निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तर काही उमेदवारांनी निवडणूक उमेदवार म्हणून आपली वर्णी लागण्यासाठी एका संघटनेकडून उमेदवारी अर्ज भरला. आणि अंतिम उमेदवारी यादी जाहीर झाल्यावर दुसऱ्याच संघटनेचे उमेदवार असल्याचे जाहीर केले आहे. असे सोयीचे राजकारण करणाऱ्यांची संख्या यंदाच्या निवडणुकीत जास्त प्रमाणात असल्याचे लक्षात येते. पदवीधर मतदार संघात महिला गटातून अभाविपतर्फे आरती शिंदे ( एम. एस्सी ) विरूध्द आजी-माजी विद्यार्थी संघटनेच्या प्रियांका धनवडे अशी लढत होणार आहे. तर इतर दोन उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी प्रत्यक्ष लढत शिंदे आणि धनवडे यांच्यातच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### सिनेटसाठी राज्यपाल नियुक्त जागेकडे सर्वांचे लक्ष

विद्यापीठ निवडणुकीत सिनेटच्या दहा जागांवर राज्यपाल व कुलगुरू नियुक्त सदस्य निवडले जाणार आहेत. या पदांसाठी सर्वच पक्षातील उमेदवारांनी अर्ज केला असून, आता या दहा जागांकडे सर्व विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### विद्यापीठ यंत्रणा सज्ज

विद्यापीठ अधिकार मंडळाचे मतदान सुरळीत पार पडावे म्हणून विद्यापीठ प्रशासनाने निवडणूक यंत्रणा सज्ज केली आहे. तीन जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रावर सव्वाशे लोकांची नियुक्ती केली असून, त्याना ट्रेनिंग देणे सुरू आहे. तर मतपत्रिकांची छपाई अंतिम टप्प्यात आहे. सर्व मतदार केंद्रावर प्राथमिक सोयीसुविधा केल्या असून, आवश्यक तेवढ्या मतपेट्या पुरवल्या जाणार आहेत.

### भाजपची प्रचार यंत्रणा सज्ज

विद्यापीठ निवडणुकीसाठी भाजप पाचशे कार्यकर्त्यांचा फौजफाटा प्रचार करीत आहे. या कार्यकर्त्यांनी कोणत्या मतदारांना संपर्क साधला, याची आढावा बैठक सोमवारी भाजप जिल्हा कार्यालयात घेण्यात आली. या बैठकीत प्रचारासाठी सोशल मीडियावर भर देण्याचा निर्णय झाला. तसेच प्रत्यक्ष भेटून कलर कोडींग केलेली मतपत्रिका मतदारांना वाटण्यासाठी तिन्ही जिल्ह्यात पाठवण्यात आले. भाजपचे कार्यकर्ते अभाविपच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 NOV 2017
Times of India

# Avishkar orientation programme from Nov 23

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will organise a one-day Avishkar Research Festival orientation programme for research cell coordinators in Kolhapur, Sangli and Satara districts from November 23.

A circular from the SUK, dated November 7, said that Karad-based Sadguru Gadage Maharaj College will host the first workshop on November 23, while Willingdon College in Sangli will host the workshop for Sangli district on November 24. The final workshop will be held at Kolhapur Institute of Technology's College of Engineering on November 25.

The circular has asked the colleges to send the name of their research cell coordinator to their respective host colleges. These coordinators will later have to train the teachers and students in their colleges.

According to the SUK officials, during the workshop, experts will deliver lectures on ways of improving the quality of the research projects in the under-graduate (UG) and post-graduate (PG) programmes.

A SUK official said that Avishkar festival is organised to promote active participation of students in the research festival. The festival — an initiative from the chancellor's office to boost research culture among students and faculty members — will begin from next month in the division.